# आजकाल... असं वाटतयं ...

१४ फेब्रुवारी हा प्रेमदिन...वॅलेंटाईन डे.
प्रेमदिनाच्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा!
'प्रेमदिनाच्या' निमित्ताने पूर्वी लिहिलेला एक छोटा लेख आपल्यापुढे सादर करीत आहे.

**आजकाल... असं वाटतयं...**

आजकाल काय होतंय तेच कळत नाही.
परत प्रेमात पडल्यासारख वाटतयं. वयाची १५ वर्ष मागे गेल्यासारखं वाटतंय.
उरात धडधडतंय आणि कसली तरी हुरहूर लागून राहिली आहे.
उत्साह नुसता अंगभर उसळतो आहे. अंग पिसासारखं हलकं झालं आहे.
जे काही आजूबाजूला घडतं आहे, त्याची कंपनं सर्वांगाला स्पर्शून आरपार जाताहेत.
तळव्यापासून–डोक्यापर्यंत एक गोड शिरशिरी कायम वास्तव्यं करुन बसली आहे.
सगळ्यांवर खूप–खूप प्रेम करावसं वाटतं आहे. हे नक्कीच शारिरीक नाही, याची नकळत कुठेतरी जाणीव आहे.
भूक हरपली आहे, तहान हरपली आहे. प्रेमसंवाद, प्रेमकविता, प्रेमगाणी हृदयाला भेदून आरपार जाताहेत.
काय होतं आहे तेच कळत नाही.
हिवाळ्यातली ही बोचरी थंडी, स्नो–स्लीट, पावसाची पिरपिर सगळचं रोमॅंटिक वाटतंय.
खाण्याची वासनाच उडाली आहे. भजी खाण्यापेक्षा हातात एक 'ग्रीन टी'चा कपच् हवाहवासा वाटतो आहे.
खूप काही करावसं वाटतं आहे....खूप काही करतेसुध्दा आहे....पण तरीही हे सगळं अपुरं वाटतं आहे....
....काहीतरी बाकी आहे असं वाटतंय...अजून खूप काही करण्याचं पोटेंशियल आहे, पण काय ते लक्षात मात्र येत नाही.
नाचावंसं वाटतं आहे, बागडावंसं वाटतं आहे. पावसात चिंबचिंब भिजावंसं वाटतं आहे. गाणी गावी, असं वाटतय...कुणीतरी माझ्यासाठी प्रेमगाणी गावीत, असंही वाटतं आहे...एरवी फोनवर अगदी कामापुरतं बोलणारी मी, हल्ली फोनवर सगळ्यांशी आवर्जून खूप गप्पा मारते आहे.
मन खूप उचंबळुन आलंय. खूप–खूप पॉसिटीव्ह वाटतंय. या हिवाळ्यामधे बाहेर कितीही अंधारुन आलं, तरी आतून खूप स्वच्छ वाटतयं. मोकळं झाल्यासारखं वाटतं आहे.
कुणा एकावर नाही तर अख्ख्या जगावर प्रेम करावंसं वाटतं आहे.

**- राजश्री कुलकर्णी (न्यू जर्सी)**